**महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम**
**प्रसिध्दिसाठी वृत्तपत्राच्या बातमीदारांना पुरस्कार**
**याबाबत राज्यस्तर समितीचे गठण.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
शासन निर्णय क्र.तंमुगा/१००८/प्र.क्र.१९/पोल-१५,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक : १४ जुलै, २००८.

**वाचा :-** १) गृह विभाग शासन निर्णय क्र.एमआयएस-१००७/सीआर-२३८/पोल-८, दिनांक १९ जुलै, २००७.
२) गृह विभाग, शासन निर्णय क्र.तंमुगा/१००८/प्र.क्र.१९/पोल-१५, दिनांक ११ एप्रिल, २००८.
३) गृह विभाग, शासन निर्णय क्र.तंमुगा/१००८/प्र.क्र.१९/पोल-१५, दिनांक १७ जून,२००८.

**शासन निर्णय :-** महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम प्रभावी व यशस्वीरीत्या राबविण्यामध्ये पूरक व प्रबोधनात्मक बातम्यांच्या माध्यमातून मोहिमेतील कामांना वस्तुनिष्ठ प्रसिध्दी देणाऱ्या वृत्तपत्रांच्या बातमीदारांना जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तरावर प्रत्येकी तीन पुरस्कार देण्याची तरतूद दिनांक १९.७.२००७ च्या शासन निर्णयातील परिच्छेद-१५ मध्ये केली आहे. प्रसिध्दीसाठी वृत्तपत्राच्या बातमीदारांना पुरस्कार देण्याबाबतची योजना संदर्भाधीन दिनांक ११ एप्रिल, २००८ च्या शासन निर्णयान्वये विहित केली असून त्यानुसार राज्यस्तरावरील पुरस्कारासाठी उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्याकरिता राज्यस्तर समितीचे खालीलप्रमाणे गठण करण्याचा शासन निर्णय घेत आहे.

**राज्यस्तरीय समिती**

| | | |
|---|---|---|
| १) मा.उपमुख्यमंत्री (गृह) | - | अध्यक्ष |
| २) मा.राज्यमंत्री (गृह) | - | सदस्य |
| ३) अपर मुख्य सचिव (गृह) | - | सदस्य |
| ४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई | - | सदस्य |
| ५) प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग | - | सदस्य |
| ६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | - | सदस्य |
| ७) उप/सह सचिव, गृह विभाग | - | सदस्य |
| ८) श्रीमती सुप्रिया पाटील,अध्यक्ष, मराठी पत्रकार परिषद | - | सदस्य |
| ९) श्री. अभय देशपांडे, अध्यक्ष, मंत्रालय व विधीमंडळ वार्ताहर संघ | - | सदस्य |
| १०) राज्यातील मराठी हिंदी व इंग्रजी वृत्तपत्राचे प्रत्येकी १ संपादक | - | ३ सदस्य |

१) श्री.प्रकाश कुलकर्णी, संपादक, दै.नवशक्ती,मुंबई (मराठी वृत्तपत्र)
२) श्री.प्रकाश दुबे, संपादक, दै.भास्कर, नागपूर (हिंदी वृत्तपत्र)
३) श्री.आनंद आगाशे, संपादक, दै.सकाळ टाइम्स, पुणे (इंग्रजी वृत्तपत्र)

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:-
आवक नं.:- DC 868२९
2 - 1 AUG 2008
विशेष नोंद वही नं.:-
कार्य विवरण नं.:-
प्र. लि. चि. उ. जि.

Govt. Ref 1124/08

समितीतील अशासकीय सदस्यांना बैठकीसाठी उपस्थित राहण्याकरिता सचिव स्तरावरील अधिकाऱ्यास अनुज्ञेय असलेला प्रवास भत्ता आणि दैनिक भत्ता अनुज्ञेय करण्यात येत आहे. याबाबतचा खर्च गृह विभाग मागणी क्रमांक : बी - १ , प्रधान लेखाशीर्ष - २०५५ पोलीस, (००) (१०९) जिल्हा पोलीस (००)(१०)

तंटामुक्त गाव मोहिम, ११ देशांतर्गत प्रवास खर्च (२०५५- ०५३-३) योजनेत्तर / दत्तमत याखालील मंजूर तरतुदींतून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संकेतांक २००८०७१४१११४४२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मा.आ.गुट्टे

( मा.आ.गुट्टे )
अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव.
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व पोलीस अधीक्षक.
सर्व उप विभागीय अधिकारी
सर्व गटविकास अधिकारी
सर्व तहसीलदार